## अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, यवतमाळ

**सत्र खटला क्र. ९७/२०२५**
**निशाणी क्र. ३०**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. वडकी** **सरकारी अभियोक्ता**
**..वि..**
**प्रकाश नथ्थुजी देहारकर** **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ४** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | मुकूंद मनिराम जाधव |
| वय अंदाजे ४६ वर्षे | धंदा– लाईनमन म.रा.वि.वि.कं.म., पुसद |
| राहणार | पुसद, ता पुसद, जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. यु. के. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

सन २०२३ मध्ये मी वडकी येथे म.रा.वि.वि.कं.म. मध्ये प्रधान तंत्रज्ञ म्हणून कार्यरत होतो. दिनांक १५/११/२०२३ रोजी मला श्री गिरी साहेबांनी पिंप्रि येथे विज चोरी असल्यामुळे तेथील लाईन बंद करण्यासाठी सोबत चलण्यासाठी सांगीतले. त्यानूसार मी गिरी साहेबांसोबत देहारकर च्या शेतामध्ये गेलो होतो. तेथे गिरी साहेबांनी रितेश नावाच्या मुलाला फोन करुन लाईन कट करण्यासाठी बोलवले. विजेचा पुरवठा अवैध आहे असे गिरी साहेबांनी ग्राहकाला सांगीतले. त्यामुळे गिरी साहेबांचे व त्या ग्राहकाचे भांडण झाले. त्या ग्राहकाने गिरी साहेबांना वायरने मारहाण केली. मी आणि रितेशने त्यांचे भांडण सोडविले. त्यानंतर गिरी साहेबांनी पोलीस स्टेशनला जावून रिपोर्ट दिला. ज्या ग्राहकाने गिरी साहेबांना मारहाण केली होती तो ग्राहक आज न्यायालयामध्ये आरोपी म्हणून हजर आहे व त्याचे नाव प्रकाश देहारकर आहे. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते.

**<u>उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. आर. डी. सोनटक्के यांचे मार्फत सुरु –</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की माझे गिरी साहेबांसोबत चांगले संबंध आहे. पूर्वी माझा आरोपीसोबत परिचय नव्हता, तसेच मला त्याचे नाव व पत्ता सुध्दा माहित नव्हता. पिंप्रि गावामध्ये बरेच ग्राहक आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या कार्यालयामध्ये विज चोरीची

कोणतीही तक्रार आली नव्हती. घटनास्थळावर असलेले शेत कोणाचे आहे हे मला माहिती नाही. दिनांक १५/११/२०२३ नंतर माझा पोलीसांसोबत संपर्क आला नाही.

३. पोलीसांना बयान देतेवेळी मी सांगीतले नव्हते की "*तेथे गिरी साहेबांनी रितेश नावाच्या मुलाला फोन करुन लाईन कट करण्यासाठी बोलवले*" . हे म्हणणे खरे नाही की गिरी साहेबांनी मला कोर्टात काय बोलावयाचे आहे हे सांगीतले. हे म्हणणे खरे आहे की गिरी साहेबांनी मला सांगीतले होते की आज न्यायालयामध्ये तारीख आहे. हे म्हणणे खरे आहे की गिरी साहेबांच्या सांगण्यावरुन मी आज माझा पुरावा देत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमोर आरोपीने गिरी साहेबांना मारहाण केली नाही तसेच मी घटनास्थळावर सुध्दा गेलो नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की *"मी गिरी साहेबांसोबत देहारकर च्या शेतामध्ये गेलो होतो, तेथे गिरी साहेबांनी रितेश नावाच्या मुलाला फोन करुन लाईन कट करण्यासाठी बोलवले, विजेचा पुरवठा अवैध आहे असे गिरी साहेबांनी ग्राहकाला सांगीतले. त्यामुळे गिरी साहेबांचे व त्या ग्राहकाचे भांडण झाले, त्या ग्राहकाने गिरी साहेबांना वायरने मारहाण केली, मी आणि रितेशने त्यांचे भांडण सोडविले, त्यानंतर गिरी साहेबांनी पोलीस स्टेशनला जावून रिपोर्ट दिला, ज्या ग्राहकाने गिरी साहेबांना मारहाण केली होती तो ग्राहक आज न्यायालयामध्ये आरोपी म्हणून हजर आहे व त्याचे नाव प्रकाश देहारकर आहे"* . हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे. मी आज खरी साक्ष दिलेली आहे, हे साक्षीदाराने स्वतः नंतर सांगीतले.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपासणी–काही नाही.</u>** **श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
दिनांक – २०/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.